**नियमित दिवाणी दावा क्र. ८८/२०१०**
मारुती तावडे वि. विजय तावडे वगैरे

## निशाणी क्र. २५३ ते २५५ वर एकत्रीत आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून, अबेटमेंटचा रद्द होवून त्याचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, या कामातील प्रतिवादी क्र. ६ मोहन सखाराम तावडे हे दि. ०६/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. वादी यांना कोर्ट कामाबाबत पुरेशी माहिती नसल्या कारणाने मयत प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाही. सदरचा दावा हा वाटपाचा असल्याने दाव्याचे अंतिम निराकरण होण्यासाठी मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तरी सदरचे वारस आणणे झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणे परवानगी मिळणेची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जात नमूद केलेले कारण खोटी व खोडसाळ आहेत

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाण २५८ येथे प्रतिवादी क्र. ६ चा मृत्यूदाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्यांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ६ मोहन सखाराम तावडे हे दि. ०६/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने बऱ्याच उशिराने दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमूद केलेले प्रतिवादी मयत झाल्याची माहिती त्यांना मिळाली नाही हे कारण स्विकारार्ह नाहीत. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र ६ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**नियमित दिवाणी दावा क्र. ८८/२०१० नि. २५३ ते २५५**</u>
मारुती तावडे  वि. विजय तावडे वगैरे

– <u>आदेश</u> –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/– देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत दुरुस्ती करावी.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः १३/०३/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.